# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ११/०४/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. वेलतुर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडपिंपरी पुनर्वसन येथे दिनांक ०८/०४/२०२२ ते दिनांक दि. १०/०४/२०२२ चे ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुनील हरीचंद डहारे, वय ४० वर्ष रा. धामणी याचे २९ कट्टे चना व अजय रूपचंद मने यांचे २ कट्टे चना असा एकुण ३१ कट्टे चना एकुण किमी ७४,४००/— रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने गोंडपिंपरी पुनर्वसन येथील समाज मंदिराच्या ग्रिल गे ला लावलेला कुलुप तोडुन चोरून नेलो आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नितेश डोर्लीकर मो.क्र. ९५९५६७८२३४ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत सुकडी रोड हिंगणा एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०९/०४/२०२२ चे १७.०० वा. ते १०/०४/२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— विशाल इंद्रकुमार चानेकर, वय ४४ वर्ष, रा. प्लॉट नं १३८ मेन रोड नंदनवन ले आउट नागपुर यांचे मावशी नामे— श्रीमती सुनिता अशोकाव वाढोकर प्लॉट नंबर ४ ए दत्तात्रय सोसायटी मनीष नगर, नागपुर यांची अन्नापुर्णा इंजिनियर वर्कप्लॉट न १५/१६ एमआयडीसी बोरी येथे कंपनी असुन ती कंपनी बंद असतांना अज्ञात आरोपीने कंपनी शटर वाकवुन प्रवेश कंपनीत केला. यानंतर आरोपीने कंपनी मध्ये असलेल्या वेल्डिंग मशीन तोडफोड करुन त्यातील तांब्याचे कॉइल काढलेले. तसेच लोखंडी डाय केबल वायर मशीन व पाने त्याची सेट असा एकुण अंदाजे ३०,०००/—रु. मुद्देमाल कंपनी बंद असतांना अज्ञात आरेपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रफुल राठोड मो. ८८०६८२८५६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर